MHLA050010022017



## <u>नि.क्र. १६४ वर आदेश</u>
## <u>(दिनांक ११.१२.२०२०)</u>

वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रं. १ चे नाव ते मरण पावल्यामुळे वादपत्रातून कमी करण्याकरीता सादर केला आहे. वादीतर्फे ॲड. श्री. व्ही. एस. शेळके यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रं.१ मरण पावल्याबाबत प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी पुरसीस सादर केली आहे. तसेच वादींनी प्रतिवादी क्रं. १ चे वारस हे वादपत्रात पुर्वीच समाविष्ट आहेत याबाबतची पुरसीस सादर केली आहे. त्यामुळे वादपत्रामधून प्रतिवादी क्रं. १ चे नाव कमी करणे आवश्यक आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, वादींचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. प्रतिवादी क्रं. २ ते ५ तर्फे ॲड. श्री. डी. ए.पौळ यांनी असा युक्तीवाद केला की, सदरच्या अर्जावर योग्य तो आदेश पारीत करावा.

३. वादी व प्रतिवादी यांना ही बाब मान्य आहे की, प्रतिवादी क्रं. १ हे मरण पावले आहेत व त्यांचे वारस हे सदरच्या दाव्यात समाविष्ट आहे. तसेच वादींनी मयत प्रतिवादी क्रं. १ चे वारस हे सदरच्या वादपत्रात समाविष्ट असल्याबाबतची पुरसीस नि. क्रं. १६३ अन्वये सादर केली आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

### <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादींना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मयत प्रतिवादी क्रं. १ चे नाव वादपत्रामधून दि.१५.१२.२०२० रोजी वगळावे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2020.12.11 16:40:41 +0530

अहमदपूर (अ.रा. सुर्वे)
दिनांकः– ११.१२.२०२० दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
अहमदपूर.